वसुंधरेच्या लेकी

पर्यावरण रक्षणासाठी मोहिमा निघतात, चर्चासत्रे होतात. पण त्यासाठी प्रत्यक्षरित्या काय करायचं हे आपल्या लक्षात येत नाही. मात्र पर्यावरणाचं संरक्षण, संवर्धन आणि पुनरूज्जीवनाची जाणीव निर्माण करण्याचं काम ऑयकॉसच्या माध्यमातून केतकी घाटे आणि मानसी करंदीकर या करीत आहेत. ५ जून रोजी जगभरात साजरा होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त त्यांच्या कामाचा हा परिचय.

आपल्या परिसरातील जैविक समृद्धता, विविधता हे पर्यावरणाचे अविभाज्य भाग. अतिक्रमणामुळे, बदललेल्या जीवनशैलीमुळे ही जैवविविधता, निसर्गाची साखळी नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. या पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न पर्यावरण दिनाच्या माध्यमातून करण्यासाठी निसर्गसंवर्धकाची जबाबदारी पार पाडणाऱ्या वसुंधरेच्या लेकी केतकी घाटे आणि मानसी करंदीकर यांच्या बहुमोल कामाबाबत जाणून घेऊया.

निसर्गसंवर्धन आणि व्यावसायिकतेचा मेळ घालत केतकी आणि मानसी यांनी स्थापन केलेले 'ऑयकॉस' हे एक इकॉलॉजिकल बिझनेस मॉडेल आहे. जैवविविधतेचा अभ्यास केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने त्याचा कसा उपयोग करता येईल, हे जाणून दोघींनी ऑयकॉस ही संस्था स्थापन केली. पर्यावरणाचा समतोल ढळू न देता नैसर्गिक साधनसामग्रीचं संरक्षण-संवर्धन करणे, या स्वरूपाचे प्रकल्प आखणे, त्याचा आराखडा तयार करून अंमलबजावणीपर्यंत सहभाग घेणे आणि त्यासाठी मार्गदर्शन करणारी सेवा पुरवणे, हे आयकॉसचे काम आहे. ऑयकॉस हा मूळ ग्रीक शब्द. त्यावरूनच इकॉलॉजी हा शब्द तयार झाला. निसर्गाच्या अभ्यासाचा उपयोग प्रत्यक्ष जमिनीवर करतानाच हे काम पूर्णवेळ करत याला व्यावसायिकतेची जोड देता यावी, हे ऑयकॉसचं उद्दिष्ट आहे.

निसर्गाचे पुनरूज्जीवन

निसर्गावरील प्रेम हा समान धागा दोघींना एकत्र घेऊन आला. इकॉलॉजिकल सोसायटीचे प्रसिद्ध निसर्गतज्ज्ञ प्रकाश गोळे यांच्याकडे नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट, रिस्टोरेशन अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट हा कोर्स दोघींनी केला आणि निसर्गाचं वेगळं जग त्यांना उलगडलं. दोघींची आवड एकच असल्याने एकत्रित पर्याय निवडला. यातूनच पर्यावरण पुनरूज्जीवन आणि इकॉलॉजिकल लँडस्केपिंगची संकल्पना साकारली गेली.

पर्यावरण प्रबोधनासाठी नेहमीच्या पद्धती न वापरता, प्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या ठोस कामाची गरज आहे, हे दोघींनी जाणले. तेव्हा हे काम व्यावसायिक संस्थेच्या स्वरूपात करण्याचे दोघींनी ठरवले. केवळ सामाजिक दायित्व म्हणून काम न करता पूर्णवेळ हेच क्षेत्र व्यवसाय म्हणून स्विकारायचे हे दोघींनी ठरवले.

निसर्ग संवर्धनाचा परिणाम साधण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीने आयकॉस काम करते. जमिनीचा विकास करताना हा विकास तेथील निसर्गाला पूरक कसा असेल हे केंद्रस्थानी ठेवून त्यानुसार ऑयकॉसचा पुढील आराखडा तयार होतो. तेथील जैविकतेचा अभ्यास करून त्यानुसार त्या परिसरातील नैसर्गिक स्रोतांचे व्यवस्थापन, इकोफ्रेंडली लँडस्केपिंग, नैसर्गिक पर्यटनस्थळांचा विकास अशा अनेक गोष्टी येतात. आपली जमीन, शेत याचे नैसर्गिक मूल्य राखले जाऊन निसर्गाचे संवर्धन व्हायला कशी मदत होईल यासाठी ऑयकॉसची मदत घेता येते.

परिसंस्थेचा अभ्यास

हे काम करताना शहर आणि शहराबाहेरील जमीन असं स्वरूप ठरवून त्यानुसार कामाचं स्वरूप ठरवलं जातं, असं केतकी व मानसी सांगतात. 'शहरातील वा बाहेरची फार्म हाऊस, बंगले किंवा केवळ जमिनी अथवा इको टुरिझम वा अॅग्रो टुरिझमसाठी लँडस्केपिंगचे काम करताना तेथील जमिनीचा, हवामानाचा, पाण्याचा आणि भौगोलिक स्थितीनुसार आढळणाऱ्या परिसंस्थेचा अभ्यास केला जातो. त्यानुसार त्या जागेवर कोणती झाडे लावणे अनुकूल आहे, त्याच्या फळा-फुलांपासून कोणते पक्षी, फुलपाखरे कीटक या ठिकाणी येऊ शकतील, हे सारे अभ्यासूनच झाडे लावली जातात.

आपल्याकडे जेव्हा एखाद्या जमीनीचा विकास वा बांधकाम केले जाते, तेव्हा त्यात जमीन, पाणी, तेथील परिसंस्था आणि माणसांचा वावर यांचे संतुलन राखले जात नाही. त्यामुळे तेथील नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, त्याचं संरक्षण या गोष्टी दुर्लक्षित राहतात. त्यामुळे सध्या होणारा विकास हा एकांगी आहे. केवळ आपल्यासाठी आहे. यात पर्यावरणाचा विचार केला जात नाही. म्हणूनच हा विकास साधताना त्याचे निकष आपण ठरवायला हवेत.

कोणत्याही जागेचा अभ्यास करताना प्रथम त्याचं नैसर्गिक मूल्य ठरवावं लागतं. यासाठी किमान दोन ऋतूंचा अभ्यास केला जातो. पर्यावरणीय सर्व्हेक्षणातून अनेक बाबी समोर येतात. 'इको मॅप' आखला जातो. हा 'इको मॅप' म्हणजे थोडक्यात त्या जमिनीची, जागेची कुंडलीच असते. त्यानुसार बांधकाम क्षेत्र, बगिचा यांचं नियोजन केलं जातं. त्या जागेतील दुर्मिळ पक्ष्यांचं, वनस्पतींचं अस्तित्व शोधलं जातं. हे सर्व बदल करताना निसर्गाचं पुनरूज्जीवन हाच मुख्य उद्देश असतो.'

आपल्यासाठी कोणत्याही सुविधा निर्माण करताना तेथील निसर्गावर अतिक्रमण होत आहे, ते टाळलं पाहिजे. इतकी साधारण बाब जरी लोकांच्या लक्षात आली तरी आमच्या कामाचा उद्देश सफल झाला असं आम्ही मानतो,' असं केतकी म्हणतात.

सुरुवातीला आयकॉसबाबत लोकांना नीटशी माहिती नव्हती. परंतु पर्यावरणाचं महत्त्व जसं लोकांच्या लक्षात येऊ लागलं तसतसं अनेक जमिनींच्या पुनरुज्जीवनाची कामे आयकॉसकडे येऊ लागली. शेती, फार्महाऊस वा जमिनीचे पुरुज्जीवन करताना पर्यावरणपूरक तंत्राचा अवलंब करणे महत्त्वाचे असते. पण त्यातील अज्ञानामुळे अनेक चुकीचे मार्ग अवलंबिले जातात. जे तेथील निसर्गासाठी, परिसंस्थेसाठी अपायकारक ठरतात. म्हणूनच अशा ठिकाणी निसर्गसंवर्धनाच्या दृष्टीने कोणते बदल करता येतील हे केतकी आणि मानसी सांगतात. निसर्गाकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न करतात. उपलब्ध जमिनीवर निसर्गाला पूरक असेच बदल करावेत यासाठी त्या प्रयत्नशील आहेत.

या कामाकडे व्यवसाय म्हणून पाहताना केतकी-मानसी यांना ग्राहकांच्या आवडीनिवडींशी जुळवून घ्यावे लागते. यात महत्वाचे असते ते म्हणजे लोकांच्या शेती वा जमिनीबाबतच्या पूर्वल्पना बदलणे. आपल्याकडे असे बदल करताना पाश्चात्य पद्धतींचा अवलंब केला जातो. जो पूर्णतः चुकीचा आहे. सगळीकडे लॉन करणे, छान दिसणारी परदेशी झाडे लावणे किंवा तिथली मूळची झाडेझुडपे काढून टाकणे असे बदल लोकांना अपेक्षित असतात. परंतु तेथील हवामान, जमिनीचा कस या सगळ्या गोष्टी बदलता येणे शक्य नसते. म्हणूनच त्यासाठी लोकांचे समुपदेशन करणेही आवश्यक आहे, असं केतकी-मानसी सांगतात. यासाठी त्यांनी लॉनसाठी सांडपाण्याचा प्रयोग करून रूट झोन सिस्टीमचा अवलंब केला आहे. याकरिता बोरू हे विशिष्ट प्रकारचं झाड वापरलं जातं.

'स्वदेशी' चळवळ

परदेशी झाडांची मागणी करणाऱ्या लोकांना आपल्याकडच्या जैवविविधतेची जाणीव करून देणे, स्थानिक झाडांचे महत्त्व पटवून देणे हे महत्त्वाचे काम

ओढ्यावरचा बांध



केतकी आणि मानसी करतात. स्थानिक झाडांबाबत जागरुकता वाढण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. त्यांच्याकडे आलेल्या कामामध्ये स्थानिक झाडे रुजविण्याकडे त्यांचा कल असतो. ग्राहकाला समजावून त्याला निसर्गसंवर्धनाचं महत्त्व पटवून देऊन कधी पूर्णतः स्थानिक झाडं लावली जातात किंवा परदेशी व स्वदेशी झाडांचे कॉम्बिनेशन केलं जातं. याकरिता त्यांनी एक सीडी तयार केली असून यात स्थानिक झाडांच्या ३०० प्रजाती पाहावयास मिळतात. स्थानिक झाडांची नर्सरी असून त्याद्वारे स्थानिक झाडांबाबत प्रबोधन केले जाते. याशिवाय आयकॉस आणि पुण्यातील इतर संस्थांनी एकत्रित येऊन 'नेटीव्ह ग्रोअर्स' हा गट तयार केला आहे, ज्याच्याद्वारे स्थानिक झाडांबाबत माहिती देण्यात येते. शिवाय या झाडांची रोपेदेखील उपलब्ध करून दिली जातात.

पर्यावरणीय समतोल राखायचा असेल तर आपल्या भागातील जैवविविधतेचा (बायोडायव्हर्सिटी) अभ्यास केला पाहिजे, इथल्या मातीत आणि या हवामानामध्ये रुजतील, फोफावतील अशी स्वदेशी झाडे लावली पाहिजेत, असा ऑयकॉसचा आग्रह आहे. स्वदेशी झाडांकडे विशिष्ट पक्षी आकृष्ट होतात, या झाडांची अतिरेकी वाढ होत नाही, ते जमिनीतून अतिरिक्त पाणी शोषत नाहीत आणि या झाडांमुळे जमिनीचा कसही उत्तम राहतो, हे सिद्ध झालं आहे. अशा प्रकारे इकॉलॉजिकल लँडस्केपिंग करताना स्वदेशी झाडांची चळवळ जोपासण्याचं महत्त्वाचं काम ऑयकॉस करत आहे. कदंब, पळस, वड, फणस, उंबर, पिंपळ, बाहवा, बकुळ, आंबा, सोनचाफा, जांभूळ, पांगिरा, काटेसावर अशी अनेक झाडे अधिकाधिक लावली जावीत यासाठी ऑयकॉस प्रयत्नशील आहे. तसेच झाडांच्या वेगवेगळ्या स्थानिक जातींची रोपे एका जागी मिळणे सोयीचे व्हावे, यासाठी त्यांनी पुण्यातील कर्वेनगर येथे स्वतःची एक नर्सरी सुरू केली आहे.



गेल्या दहा वर्षांत त्यांनी संपूर्ण अनेक छोट्या-मोठ्या विकास प्रकल्पांवर काम केले आहे. लवासा सिटी, मुळशी येथील मयुरवन व तत्सम उपक्रमांमधून पर्यावरणाविषयी जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न त्या करतात. देवावरील श्रद्धेने वर्षानुवर्षे जपलेल्या जुन्नरच्या अंजनावळे देवराई आणि जव्हारची कळंब विहिरा देवराई या देवराईंच्या पुनरुज्जीवनाचे कामही केले जात आहे. या देवराईंचे पुनरुज्जीवन बाएफद्वारे (भारतीय अॅग्रो इंडस्ट्रीज फाउंडेशन) ऑयकॉसच्या मदतीने केले जात आहे. तसेच अभिनेता अतुल कुलकर्णी यांच्या साताऱ्याजवळील २४ एकर ओसाड जमिनीवरही प्रयोगशील काम त्या करत आहेत. मागील चार वर्षांच्या अथक प्रयत्नांद्वारे तेथे हिरवाई साकार केली जात आहे.

इकॉलॉजिकल सेवा पुरवणे हे केतकी व मानसी यांनी व्यवसाय म्हणून स्वीकारले असले तरी, या वेगळ्या क्षेत्राची माहिती सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी, आपल्या प्रत्येक लहान-मोठ्या कृतीत जाणीवपूर्वक पर्यावरण रक्षणाचा विचार जोपासण्यासाठी त्या सामाजिक बांधिलकीच्या भावनेने धडपडत आहेत. यासाठीच त्यांना खाजगी अभयारण्य उभारायचं आहे. जे निसर्गाच्या तत्वांची जोपासना करून केवळ जीवसृष्टीसाठीच असेल.

आपल्या या भूमिकेशी प्रामाणिक राहात या वाटेने जाताना लोकांचा प्रत्यक्ष सहभाग घेण्याकडे त्यांचा कल आहे. त्यादृष्टीने त्यांनी आपल्या कामाला अनेक उपक्रमांची जोड दिली आहे. वाईतील ग्राममंगल या शाळेसाठी पर्यावरण विषयावरील पाच वर्षांचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी त्या प्रयत्नशील आहेत. शिक्षण आणि व्यावसायिक क्षेत्रातील याचे फायदे मुलांना पटवून देण्यासाठी त्या प्रयत्न करीत आहेत. यासाठी अनेक ठिकाणी त्या लेक्चर्स घेतात, मोहिमा राबवतात, शिबीरांचे आयोजन करतात.

विशेष महत्त्वाचे म्हणजे, केतकी आणि मानसी दोघींनाही या कामासाठी घरच्यांचा पाठिंबा आहे. अगदी सुरुवातीच्या काळातही जेव्हा यातील उत्पन्न नगण्य होतं, तेव्हाही घरच्यांनी याबाबत प्रोत्साहनच दिलं, असं दोघीही सांगतात. दोघींची जीवनशैली आणि कामाचं स्वरूप घरच्या मंडळींना मान्य असल्याने त्या स्वतंत्ररित्या काम करू शकतात.

निसर्गाचे संवर्धन म्हणजे नेमके काय, याची व्याख्या या काळात विस्तारत गेली आहे. ही व्याख्या समजून घेण्यास ऑयकॉस आपल्याला मदत करते आणि या विस्तारलेल्या व्याख्येत आपली भूमिका काय, याचाही अंदाज आपल्याला येतो. निसर्ग जपण्याची, फुलविण्याची केतकी आणि मानसी यांची आंतरिक तळमळ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून प्रत्येकाच्या हातून वसुंधरेची सेवा घडायला हवी.

- शुभांगी बागडे